I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** सोलापुर शहर **P.S. (पोलीस ठाणे):** जेल रोड **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0378 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 19/06/2026 05:59 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** सोमवार **Date from (दिनांक पासून):** 15/06/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 15/06/2026

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 16:06 तास **Time To (वेळेपर्यंत):** 18:30 तास

2 **Day (दिवस):** गुरूवार **Date from (दिनांक पासून):** 18/06/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 18/06/2026

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 17:28 तास **Time To (वेळेपर्यंत):** 18:20 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 19/06/2026 **Time (वेळ):** 04:30 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 008 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 19/06/2026 05:59 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **Beat No. (बीट क्र.):**

**(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** उत्तर, 02 कि.मी.

**(b) Address (पत्ता):** मा अधिक्षक माध्यमिक वेतन, व भविष्य निर्वाह निधी कार्याल, सोलापूर,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

2. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** उत्तर, 02 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** मा अधिक्षक माध्यमिक वेतन व, भविष्य निर्वाह निधी कार्यालय, समोरील रस्त्यावर सोलापुर ,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** शैलेश चंद्रकांत पवार

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1985 (d) **Nationality (राष्‍ ट्रीयत्‍ व):**भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर, जेल रोड, सोलापुर शहर, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर, जेल रोड, सोलापुर शहर, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9112121668

**7.** **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | लक्ष्मण दत्तात्रय बालवाड | | | 1. मुपो वायगाव,ता अहमदपूर,Town/Village (शहर / गाव): जि लातुर,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): जेल रोड,District (जिल्हा): सोलापुर शहर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | अण्णासाहेब दगडू मेटकरी | | | 1. Town/Village (शहर / गाव): सोलापूर,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 3 | विक्रम हरिश्चंद्र बारबोले | | | 1. विठ्ठल मंदिराजवळ,मोहोळकर चाळ,Town/Village (शहर / गाव): कुर्डूवाडी,ता माढा जि सोलापुर,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8.** **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9.**

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

**Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रोख रक्कम | 6,000.00 |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 6,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद दि. 19/06/2026

मी, शैलेश चंद्रकांत पवार, वय - 41 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद-पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर मो. नं. 9112121668 समक्ष फिर्याद देतो की,

मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर युनिट येथे माहे जुलै 2025 पासून पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

दि.15/06/2026 रोजी 13:30 वा. चे सुमारास आम्ही कार्यालयात असताना प्रशांत चौगुले, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर यांनी आम्हास त्यांचे कक्षामध्ये बोलावून घेतले व त्यांचे समोर बसलेल्या व्यक्तीची व माझी आपसांत ओळख करुन दिली. सदर व्यक्ती तक्रारदार राजेश दत्तात्रय पुजारी, वय- 53 वर्षे, व्यवसाय- सह. शिक्षक, रा. शिवशक्ती मैदानाचे पाठीमागे, बारबोले प्लॉट, बार्शी, मुळ रा.उपळा (दुमाला), ता. बार्शी, जि. सोलापुर हे असून त्यांनी आम्हांस समक्ष भेटून त्यांचेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार दिली असून त्याअनुषंगाने आज रोजी पडताळणी करून पुढील कारवाई करणेबाबत आम्हाला तोंडी आदेश दिले. त्यानुसार आम्ही दि.15/06/2026 रोजी आमचेकडील अंमलदार यांचे मार्फत मा. उप वनसंरक्षक अधिकारी, वनविभाग, सोलापूर या कार्यालयास पंच मिळणेबाबत पत्र देवून, दोन शासकिय पंच उपलब्ध करून घेतले. सुमारे 14.00 वा चे सुमारास 1) अविनाश संतोष पुंड पद- लिपीक, नेम- उप वनसंरक्षक कार्यालय, सोलापूर वनविभाग, सोलापूर व 2) मुकुंद बाळासाहेब होळकर पद- लिपीक, नेम- उप वनसंरक्षक कार्यालय, सोलापूर वनविभाग, सोलापूर हे दोन्ही पंच साक्षीदार ला.प्र.वि. सोलापूर या कार्यालयात आमच्या समक्ष हजर झाले. त्यावेळी मी दोघा पंचांना माझी ओळख सांगुन तक्रारदार राजेश दत्तात्रय पुजारी, वय- 53 वर्षे, व्यवसाय- सह. शिक्षक, रा. शिवशक्ती मैदानाचे पाठीमागे, बारबोले प्लॉट, बार्शी, मुळ रा.उपळा (दुमाला), ता. बार्शी, जि. सोलापुर यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालय, सोलापूर येथे जाऊन पडताळणी व पुढील कारवाई करणेकामी पंच म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का? अशी विचारणा

करता, दोन्ही पंच साक्षीदार यांनी पंच म्हणून काम करण्यास त्यांची संमती दिली. त्यानंतर आम्ही दोन्ही शासकीय पंच व तक्रारदार राजेश पुजारी यांची आपसांत ओळख करून दिल्यानंतर आम्ही तक्रारदार पुजारी यांना पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता व त्यांची तक्रारीबाबत थोडक्यात हकीकत विचारली असता त्यांनी त्यांचे नाव राजेश दत्तात्रय पुजारी असे असल्याचे सांगून, त्यांनी जागा खरेदी करणेसाठी त्यांचे जीपीएफ फंडातून 5,00,000/- रू रक्कम मिळावी यासाठी सर्व कागदपत्रे जोडून जा.क्र. ज.वि.ज्यु.कॉ. टे./ 105/2025 - 26 दि. 28/04/2026 अन्वये मा. अधिक्षक (माध्यमिक) साहेब, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक सोलापूर येथे अर्ज केला होता. सदर अर्जावर पुढील कार्यवाही होवून त्यांना त्यांचे फंडातील रक्कम देणेसाठी वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक सोलापूर येथील बारबोले यांनी 1000/- रु. ऑनलाईन घेतले आहेत. तसेच वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, सोलापूर येथील क्लर्क मेटकरी हे पुढील काम करण्यासाठी 5,000/- रू लाचेची मागणी करीत असून त्यांच्याविरूध्द योग्य ती कारवाई करण्यात यावी अशा आशयाची तक्रार सांगुन त्यांनी त्यांची सविस्तर तक्रार स्व:हस्ताक्षरामध्ये लिहुन दिली. त्यानंतर सदरची तक्रार आम्ही व दोन्ही शासकीय पंचांनी वाचून त्यावर सह्या केल्या.

तक्रारदार राजेश दत्तात्रय पुजारी यांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी पंच क्र.1 म्हणून अविनाश संतोष पुंड व पंच क्र.2 म्हणून मुकुंद बाळासाहेब होळकर यांनी काम पाहण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही तक्रारदार पुजारी, दोन्ही पंच साक्षीदार यांना आमचेकडील सोनी कंपनीचे IC RECORDER ICD-UX570F 5V SONY CORP. MADE IN CHINA 1080939 व्हॉईस रेकॉर्डर व NEXUS कंपनीचेे 08 जीबीचे मेमरीकार्ड असुन त्याचे समोरील बाजुस NEXUS Micro 10 SD HC 8 GB त्याच्या मागील बाजूस NKS-XY1/26 CE MMC08AX215F-TO DLD XY 2601 MADE IN TAIWAN असे वर्णनाचे नवीन मेमरीकार्ड दाखवुन त्यांचा वापर व उपयोग समजावून सांगितला. त्यानंतर पोह/571 मुल्ला यांचे मोबाईलमध्ये तक्रारदार व दोन्ही पंचाचे पडताळणी करवाईचे अनुषंगाने व्हिडीओ चित्रीकरण करण्याचे ठरवले. त्यावेळी पोह/571 मुल्ला यांचा मोबाईल दाखवीला असता सदरचा मोबाईल पाहता तो रिअलमी कंपनीचा असुन त्यांचे मॉडेल pro-14 असे आहे. तसेच सदर मोबाईल फोनची Operating System Android आहे. मी दिलेल्या निर्देशावरुन पोह/571 मुल्ला यांनी सदर मोबाईला पाठीमागील बाजूस एकुण तीन कॅमेरे असल्याचे आम्हाला दाखविले. सदर मोबाईलमध्ये मेमरी कार्ड स्लॉट नसल्याने पडताळणी कारवाईनंतर व्हिडीओ चित्रीकरण हे मोबाईल मधील अंतर्गत स्टोरेजवर चित्रीकरण करुन त्यानंतर सदरचे चित्रीकरण हे पुन्हा मेमरीकार्डवर सेव्ह करण्याचे ठरिवण्यात आले. त्यानंतर तक्रारदार पुजारी व दोन्ही पंचांचे पडताळणीपुर्व निवेदन 15.54 वा. चे सुमारास व्हॉईसरेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करून घेण्यात आले. तक्रारदार आणि पंचांची निवेदने घेताना त्याचे व्हिडीओ चित्रीकरण वर नमुद मोबाईलच्या माध्यमातून पोह/571 मुल्ला यांनी केले. त्यानंतर तक्रारदार पुजारी व पंच क्र.1 पुंड यांना पडताळणीकामी योग्य त्या सुचना देऊन त्यांना तक्रारदार पुजारी यांचे कडील टी.व्ही.एस. कंपनीची मोटर सायकल वाहन क्र. एम.एच.13 ई.ए.0618 या वाहनाने 16.06 वा. चे सुमारास आम्ही बारबोले व मेटकरी यांची भेट घेण्यासाठी वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालय, सोलापूर येथे रवाना केले. सापळा पथक ॲन्टी करप्शन ब्युरो येथेच थांबून राहीलो. त्यानंतर 18.30 वा. चे सुमारास परत आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचे गळयातील व्हाईसरेकॉर्डर काढून घेवून बंद केला. त्यानंतर पंच क्र. 1 यांना बारबोले व मेटकरी यांना

भेटण्यास गेले असता काय घडले याबाबत हकीकत पंच क्र. 2 यांचे समक्ष आम्हास कथन करणेस सांगितली असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचेकडील मो.सायकल वरून ॲन्टी करप्शन कार्यालयातून निघून वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालय सोलापूर येथे जावून तेथील लोकसेवक मेटकरी यांना भेटलो. तेव्हा तक्रारदार यांनी नमस्ते तुम्ही ये म्हणला होता असे म्हणून असे सांगून त्यांचे कामाचे अनुषंगाने चर्चा केली. त्यावेळी बारबोले हे तेथे नसलेने मेटकरी यांनी त्यांना फोन करून या की हिकड पुजारी सर आलेत असे सांगितले. व आम्हास थांबा जरा बारबोले येवू दे असे सांगितलेने आम्ही बारबोले यांची वाट पाहत तेथेच थांबून राहीलो. बराच वेळ होवूनही बारबोले न आलेने तक्ररदार यांनी पुन्हा मेटकरी यांना विचारले असता त्यांनी थं ाबण्यास सांगितले. त्यामुळे आम्ही तेथेच थांबून राहीलो. बराच वेळ होवूनही बारबोले न आलेने तक्रारदार हे तेथील अधिक्षक बालवाड यांचे कक्षात गेले. त्यावेळी मेटकरी यांनी मला तेथेच बसण्यास सांगितलेने मी तेथेच थांबलो. व काही वेळाने तक्रारदार हे परत आले. त्यानंतर बराच वेळांनीही बारबोले न आलेने तक्रारदार यांनी त्यांचा मोबाईल क्र. 9657168420 यावरुन बारबोले यांचा मो.नं. 9922745880 यावर 5 वेळा फोन केला परंतु त्यांनी फोन उचलला नाही. त्यानंतर बराच वेळ आम्ही तेथेच थांबून राहीलो त्यानंतर पुन्हा तक्रारदार हे अधिक्षक बालवाड यांचे कक्षात जावून आले. काहीवेळांनी पुन्हा बारबोले यांना फोन लावला असता त्यांनी फोन उचलून पाच मिनीटात आलो असे सांगितले. त्यानंतर काही वेळांनी बारबोले कार्यालयात आले. त्यावेळी तक्रारदार पुजारी यांनी त्यांचे फंडाचे रक्कमेच्या अनुषंगाने चर्चा केली तेथे तक्रारदार यांचे प्रकरण सापडत नसलेने ते बारबोले व तक्रारदार यांनी शोध घेतला. बराच वेळांनी त्यांचा प्रस्ताव सापडल्याने तो मेटकरी यांचेकडे घेवून गेले. त्यानंतर तक्रारदर यांनी आमाला हेलपाट लावण्यापेक्षा विषय संपवलेला बरा.. असे म्हणून त्यांचे काम करणेस सांगितले असता बारबोले यांनी आजच करायच आत्ता.. आत्ताच करायच लगी.. हत जावून येतो आतन सही घेवून येतो.. अधिक्षक साहेबांना काय असेल ते देवून टाकू.. लगेच तुमच्या समक्षच काय असेल ते.. असे म्हणून अधीक्षक यांना लाच देणेस सांगितले. त्यानंतर बारबोले यांनी तक्रारदार यांना त्यांची बरीच माहिती विचारली, त्यानंतर बारबोले यांनी पुन्हा तक्रारदार यांना अधिक्षक बालवाड यांचेकडे घेवून गेले. तक्रारदार ही त्याचे पाठोपाठ जावून त्यांचे मागे दरवाजाजवळ थांबले. तेव्हा बारबोले यांनी हैंच काय अशील ते पटकन करुन टाक ते.. असे म्हणून अधिक्षक बालवाड यांना लाच देणेस सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी नाय मला सांगा मजी मला कस करता येतय..पटकन विषय संपवता येतय.. असे म्हणून लाच रक्कमेबाबत विचारणा केली असता बालवाड यांनी एक..एक करा..लय तुमच अर्जंटय.. असे असे म्हणुन तक्रारदार पुजारी यांना 1000/-रु. लाचेची मागणी केली. त्यानंतर बारबोले व तक्रारदार पुजारी तेथुन बाहेर आल्यानंतर क्लर्क मेटकरी यांचेकडे गेले असता, तक्रारदार यांनी तुमचे किती असे विचारल्यावर बारबोले यांनी तेंच पंजा असतय किती असतय..असे म्हणाले नंतर तक्रारदार पुजारी यांनी मेटकरी यांना पुन्हा विचारल्यावर क्लर्क मेटकरी यांनी चार करा.. चार करा आता..असे म्हणुन 4000/- रु. लाचेची मागणी केली आहे. त्यावर तक्रारदार यांनी किती असे विचारले असता बारबोले यांनी चार करा आता असे म्हणाले त्यानंतर तक्रारदार पुजारी यांनी चार का असे विचारले असता मेटकरी यांनी हं असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी येतो मग असे सांगून तेथुन निघुन तक्रारदार यांचेकडील मोटार सायकलवरून परत आले अशी हकीकत सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना बारबोले व

मेटकरी यांची भेट घेणेस गेलेनंतर काय घडले ती हकीकत सांगा असे विचारले असता त्यांनीही पंच क्र. 1 यांचेप्रमाणेच हकीकत सांगितली. त्यानंतर व्हाईस रोकॉर्डरव्दार लॅपटॉपला जोडुन ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकून खात्री केली असता ते वरीलप्रमाणे असलेचे दिसून आले.

झाले पडताळणी कारवाईवरून वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालय, सोलापूर येथील अधीक्षक बालवाड यांनी 1000/- रु. ची लाच मागणी व क्लर्क मेटकरी यांनी 4000/- रु. ची लाच मागणी केल्याचे स्पष्ट झाले.

सदर वेळी कार्यालयीन वेळ संपून गेलेने त्याचेविरूध्द सापळा कारवाई करणेचे अनुषंगाने लोकसेवक बालवाड, मेटकरी व बारबोले हे कार्यालयातून निघून गेले असल्याची शक्यता असलेने त्यांचेबाबत माहिती घेतली असता ते कार्यालयात नसलेबाबत समजले. त्यामुळे उदईक रोजी भेटण्याची वेळ व ठिकाण निश्चित करणेसाठी तक्रारदार यांचे मोबाईल नंबरवरून बारबोले यांचे मोबाईलवर फोन करून संभाषण केले. त्यावेळी बारबोले यांचेकडून लाच रक्कमेबाबत पुन्हा एकदा स्पष्टता करून घेतले असता त्यांनी मेटकरी साहेबांचे 4000/- रू व बालवाड यांचे 1000/- रू व त्यांचे 1000/- रू असे फोन पे ला पाठवण्यास सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी फोन पे नाही झालं ऍ़डजेसमेंन्ट ती आता मी काय करतो उदया किती वाजता येवून सांगा मला मी कॅशच देतो आणून. असे म्हणाले असता असता त्यंानी मी उदया दुपारनं उशिरा येणार आहे मी .. बरं..बरं मी फोन करीन  असे म्हणून दिनांक 16/06/2026 रोजी येण्यास सांगितले. त्यानंतर बारबोले यांनी फोन केलेनंतर पुढील कार्यवाही करणेचे ठरवले परंतु बारबोले यांचा फोन आला नाही. त्यानंतर दि. 17/06/206 रोजी बारबोले यांना फोन केला असता त्यांनी तक्रारदार पुजारी यांना दि. 18/06/2026 रोजी दुपारनंतर फोन करून भेटण्यास येण्यास सांगितलेले होते.

त्याकरिता सदरची कारवाई तुर्त स्थगित करून त्याबाबतचा सविस्तर पडताळणी पंचनामा करणेत आलेला आहे.

त्यानंतर दिनांक 18/06/2026 रोजी वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालय, सोलापूर येथील अधीक्षक बालवाड व क्लर्क मेटकरी यांनी मागणी केलेली लाच रक्कम तक्रारदार पुजारी यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, सोलापूर येथे हजर केली. लाप्रवि कार्यालयामध्येच नोटांचे क्रमांक लिहून घेणे, तक्रारदार व दोन्ही पंचांना ऍ़न्थ्रासीन पावडरची माहिती देऊन त्याचे प्रात्यक्षिक करणे व हजर केलेल्या नोटांचे नंबर लिहणे व सदर नोटांना पावडर लावणेबाबतच्या सुचना मी पोशि / पवार यांना दिल्या त्याप्रमाणे पोशि/पवार यांनी सदरची कारवाई केली. अशाप्रकारे सापळापुर्व कारवाई लाप्रवि कार्यालयातच करून, सापळा कारवाईच्या अनुषंगाने तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील अंमलदारांना आवश्यक त्या सुचना देण्यात आल्या. त्यानंतर पडताळणी कारवाईमध्ये वापरलेले मेमरीकार्ड सापळा कारवाईत वापरण्याचे सर्वानुमते ठरले. त्यानंतर तक्रारदार पुजारी यांना बारबोले यांना कोठे भेटायचे याबाबत 4 वेळा फोन लावला असता, बारबोले यांनी प्रथम उचलला नाही. पुन्हा बारबोले यांचा मिसकॉल पुजारी यांना आला त्यानंतर 17.09 वा. तक्रारदार पुजारी यांनी बारबोले यांना फोन लावला असता, बारबोले यांनी पेमेंटला या असे म्हणुन वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालय, सोलापूर येथे या असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार व दोन्ही पंचांचे सापळा कारवाईच्या अनुषंगाने वर नमुद मेमरीकार्डमध्ये 17.18 वा. व्हॉईसरेकॉर्डरव्दारे निवेदने रेकॉर्ड करून

घेतले. सदरचे निवेदन रेकॉर्ड पोह/571 मुल्ला यानी त्यांचे मोबाईलमध्ये व्हिडीओ चित्रीकरण केले. त्यानंतर तक्रारदार पुजारी व पंच क्र.1 पुंड यांना वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालय, सोलापूर येथील अधीक्षक बालवाड ÷व क्लर्क मेटकरी यांची भेट घेण्यासाठी 17.28 वा. रवाना केले.

त्यांचे पाठोपाठ आम्ही स्वतः, पोलीस उप अधीक्षक चौगुले, पंच क्र. 2, पोह/571 मुल्ला, पोह/1616 जाधव, व चालक पोकॉ/2026 श्रीराम असे शासकीय वाहनातून व पोह/घुगे, पोह/सोनवणे असे मो. सा. वरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर कार्यालयातुन बाहेर पडून जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर समोरुन सिव्हील चौकातुन डाव्या बाजुला वळुन, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालय, सोलापूर या कार्यालयाजवळ पोहचलो. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचे मोटर सायकल सहस्त्रार्जुन मंगल कार्यालयाचे भिंतीलगत पार्क करुन तक्रारदार व पंच हे चालत वेतन व भविष्य निर्वाह निधी कार्यालयात गेले. आम्ही सापळा पथक सदर कार्यालयाचे आजु-बाजुस कोणास संशय येणार नाही याप्रमाणे सापळा लावून थांबलो. काही वेळाने तक्रारदार, पंच व त्यांचेसोबत एक इसम वेतन व भविष्य निर्वाह निधी कार्यालयातुन खाली उतरुन कार्यालयासमोर येवून चर्चा करत थांबले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचे शर्टाच्या समोरील डाव्या बाजूच्या खिशातील लाच रक्कम उजव्या हाताने काढून त्या इसमासमोर धरली असता, सदर इसमाने ती लाच रक्कम उजव्या हाताने स्विकारुन ती त्यांचे नेसते पँटचे समोरील बाजुचे उजव्या खिशात ठेवली. त्याचवेळी तक्रारदार यांनी त्यांचा डावा हात डोक्यावरून फिरवून लाच स्वीकारल्याचा पुर्व नियोजित इशारा दिला. त्यावेळी सदर ठिकाणी सापळा लावून थांबलेले आम्ही सर्वांनी सदर ठिकाणी जावून सदर इसमास 18.20 वा. चे सुमारास रंगेहात पकडण्यात आले.

त्यानंतर पो.उप.अधी./चौगुले यांनी सहस्त्रार्जुन मंगल कार्यालय येथील दुसऱ्या मजल्यावरील वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालयामध्ये जिन्यावरुन प्रवेश करुन कार्यालयाचे डाव्या बाजुस असलेले अधीक्षक बालवाड यांचे कक्षात जावुन त्यांना ताब्यात घेतले.

त्यादरम्यान बारबोले यास ताब्यात घेतलेले ठिकाण हे रहदारीचे रस्त्यावरील असलेने बाजूलाच असलेले त्यांचे कार्यालयाचे जीन्यामधील मोकळया पॅसेजमध्ये घेवून जावून तेथे आमची ओळख सांगून त्याचेवर झालेले कारवाईची माहिती देवून त्याचेकडे लाच रक्कमेबाबत विचारणा करून त्यांनी त्यांचे नेसते पॅन्टचे समोरील उजव्या बाजूचे खिशामध्ये ठेवलेली लाच रक्कम पंचासमक्ष ताब्यात घेण्यात आली. त्यानंतर पंच क्र.2 होळकर यांनी सदर नोटांच्या क्रमांकाची तपासणी केली असता ते तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांशी तंतोतंत जुळून आले. तेथे कृत्रिम अंधार करून सदर इसमाचे उजव्या हाताचे बोटास व नेसते पॅन्टचे समोरील उजव्या बाजूचे खिशाचे तोंडास तसेच त्यांच्या ताब्यातून मिळालेल्या नोटांची अल्ट्रा व्हायोलेट दिव्याच्या प्रकाशात तपासणी करता त्यावर ॲन्थ्रासीन पावडरची हिरवट चकाकी दिसून आली. त्यादरम्यान त्यांना त्यांचे नाव विचारता त्यांनी त्यांचे नाव विक्रम हरिश्चंद्र बारबोले, वय-55 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद-ग्रंथपाल, नेमणुक-श्रीमती. रामबाई बाबुलाल सुराणा विद्यालय, चिकलठाण, ता. करमाळा, वर्ग-3, रा.विठ्ठल मंदिराजवळ, मोहोळकर चाळ, कुर्डूवाडी, ता. माढा, जि. सोलापूर असे सांगितले. तेथे सर्व प्राथमिक तपासण्या झालेनंतर सदर इसमास अधीक्षक बालवाड यांचे कक्षात घेवून जावून पंचासमक्ष बालवाड यांना त्यांचे नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांची नावे लक्ष्मण दत्तात्रय बालवाड, वय-55 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद-अधीक्षक, नेमणुक- वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालय, सोलापूर, वर्ग-2, रा. मंगल

रेसीडेन्सी, होटगी रोड, सोलापूर, मुळ रा. मु.पो. वायगाव, ता. अहमदपूर, जि. लातुर असे असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही पंचासमक्ष मेटकरी यांचेबाबत विचारपूस केली असता, बारबोले यांनी मेटकरी यांचे पुर्ण नाव अण्णासाहेब दगडू मेटकरी, वय-48 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद-वरिष्ठ लिपीक, वर्ग-3, नेमणुक-वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालय, सोलापूर असे सांगुन मेटकरी हे दुपारनंतर सुट्टी काढून त्यांचे राहते घरी त्यांचे आईचे औषधोपचाराकरीता सांगोला येथे गेले असल्याचे सांगितले. त्याच वेळी आम्ही अधिक्षक बालवाड व बारबोले यांना तक्रारदार यांचे फंडाचे प्रस्तावाचे कागदपत्राबाबत विचारले असता ते मेटकरी यांचे कपाटात असून त्याचे कपाटाचे कुलपाची चावी नसलेचे सांगितले.

त्यानंतर आरोपी व सापळा पथक असे शासकीय वाहनाने ऍन्टी करप्शन ब्युरो कार्यालय येथे आलो. तेथे आम्ही तक्रारदार यांना बोलावून सापळा कारवाईवेळी काय झाले याबाबत विचारले असता, त्यांनी सांगितले की, सापळा कारवाईदरम्यान मी व पंच क्र.1 पुंड असे वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालय, सोलापूर येथील बारबोले यांची भेट घेतली. मी बारबोले यांना पेशंट लई सिरीयर हाय मी तिकडून आलोय वेळ काढून आश्विनी वरून असे म्हणुन बोलण्यास सुरवात केली. त्यावर बारबोले यांनी एकच मिनीट.. मग जावा मग मी उदया आजून गाठ घेतो काय आता.. ही कसाय माहिती काय माणसांच पेन्शनच होत नाही मी जर आज नाही पाठवल तर.. त्यावर मी, बरं.. बरं.. होवूदे.. असे म्हणल्यानंतर बारबोले यांनी ते लेजर मधीपण ठेवल नाही. कारण तुमच त्याच दिवशी सही केली. तुम्ही आलता त्या दिवशीच सही झाली साहेब.. असे म्हणुन मग काय झाल.. कराकी काम हितच .. जातो काय त्याला.. असे म्हणल्यानंतर मी, करू का.. असे म्हणल्यावर हं.. त्यला काय.. आपल काय काय.. कुणाची चोरी हाय का.. त्यांच देणच हाय दिलच आपण.. किती हायत.. असे बारबोले यांनी मला विचारले असता, त्यावर मी अं.. मेटकरी साहेबांचे चार हजार..असे उत्तर दिले. त्यावर बारबोले यांनी चार हं..असे म्हणले. त्यावर मी, आणि बलवाड साहेबाचे एक हजार..असे म्हणल्यानंतर बारबोले हे एक हजार हं..असे म्हणाले. त्यानंतर मी, आणि तुमचे एक हजार..असे म्हणल्यानंतर बारबोले यांनी मला ती माझ काय नंतर दिल तरी चालतय.. हयांतच दिलय का..असे म्हणाले. त्यावर मी हे सहा हजार दिलेत..असे बारबोले यांना म्हणालो. त्यावर बारबोले घेतो ते ताब्यात सही आणतो.. पर्सनली घेवून म्हणजे लवकरात लवकर करण्याचा प्रयत्न करतो. असे म्हणाले असता मी, किती दिवस लागतील तरी आम्हाला असे म्हणल्यानंतर सही झाली शिक्षणाधिकारीची की प्रयत्न करून लवकरात लवकर करतो मी म्हणल माझी जबाबदारी हाय.. असे बारबोले यांनी म्हणुन मी व बारबोले तसेच पंच क्र. 1 पुंड असे बोलत-बोलत वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालय, सोलापूर कार्यालयाचे बाहेर येत असताना सदर रोडवरच बारबोले यांनी लाच रक्कम स्विकारली. सदरवेळेस मी माझा डावा हात डोक्यावरून फिरवून लाच स्वीकारल्याचा पुर्वनियोजित इशारा दिला. त्यानंतर आपण, पंच क्र. 2 व सापळा पथक असे आमचेजवळ येवून बारबोले यास व त्यानंतर वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालय, सोलापूर येथे जावून अधीक्षक बालवाड यांना ताब्यात घेवून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर येथे आले अशी हकीकत सांगितली.

त्यानंतर आम्ही झाले सापळा कारवाईदरम्यान तक्रारदार व आरोपी लोकसेवक यांचेमध्ये झालेले संभाषणाचे उतारा काढून, सविस्तर सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा करण्यात आला.

तरी दि.15/06/2026 रोजी तक्रारदार राजेश दत्तात्रय पुजारी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन करण्यात

आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान भविष्य निर्वाह निधी फंडातून 5,00,000/- रू रक्कम मंजुर करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, सोलापूर येथील अधीक्षक बालवाड यांनी º´ÉiÉ: करीता 1000/- रु. लाचेची मागणी केली. तसेच तेथील वरिष्ठ लिपीक मेटकरी यांनी स्वतासाठी 4000/- रु. मागणी केली. तसेच ग्रंथपाल बारबोले यांनी यापुर्वी 1000/- रु. ऑनलाईन स्विकारल्याचे मान्य केले व पुन्हा 1000/- रु. लाचेची मागणी करुन अधीक्षक बालवाड व वरिष्ठ लिपीक मेटकरी यांनी केलेल्या लाच मागणीस प्रोत्साहन देवून सदरची लाच रक्कम स्वतः कडे देण्यास सांगितले. तसेच दिनांक 18/06/2026 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान ग्रंथपाल बारबोले यांनी अधीक्षक बालवाड यांचेकरीता 1000/- रु. व वरिष्ठ लिपीक मेटकरी यांचेकरीता 4000/- रु. तसेच स्वतःकरीता 1000/- रु. असे एकुण 6000/- रु. लाच रक्कम तक्रारदार यांचेकडून स्वतः स्विकारली. म्हणून 1) लक्ष्मण दत्तात्रय बालवाड, वय-55 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद-अधीक्षक, नेमणुक- वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालय, सोलापूर, वर्ग-2, रा. मंगल रेसीडेन्सी, होटगी रोड, सोलापूर, मुळ रा. मु.पो. वायगाव, ता. अहमदपूर, जि. लातुर, 2) अण्णासाहेब दगडू मेटकरी, वय-48 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद-वरिष्ठ लिपीक, वर्ग-3, नेमणुक-वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालय, सोलापूर 3) विक्रम हरिश्चंद्र बारबोले, वय-55 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद-ग्रंथपाल, नेमणुक-श्रीमती. रामबाई बाबुलाल सुराणा विद्यालय, चिकलठाण, ता. करमाळा, वर्ग-3, रा.विठ्ठल मंदिराजवळ, मोहोळकर चाळ, कुर्डूवाडी, ता. माढा, जि. सोलापूर यांनी सार्वजनिक कर्तव्य करण्यासाठी बेकादेशीर पारितोषण प्राप्त करुन गैरवर्तन केल्याने नमुद वरील तिघांविरूध्द मी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7, 12 प्रमाणे सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद देत आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणेप्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.

हा फिर्यादी जबाब दिला.

समक्ष

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** shivaji savta raut (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** shivaji savta raut

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** pcmah84570

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen ) (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्‍ या/पाहिलेल्‍ या) शारीरिक वैशिष्‍ टये, व्‍ यंग आणि इतर तपशील**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्‍ मतारीख / वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(से.मी)) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्‍ या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1971 | | - | | चेचक: क्र. |

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 2 | पुरुष | 1978 | | - | | चेचक: क्र. |
| 3 | पुरुष | 1971 | | - | | चेचक: क्र. |

| **Deformities / Peculiarities (व्‍ यंग / वैशिष्‍ टये)** | **Teeth (दात)** | **Hair (केस)** | **Eye (डोळे)** | **Habit(s) (सवयी)** | **Dress Habit (s) (पोषाखाच्‍ या सवयी)** |
|---|---|---|---|---|---|
| **8** | **9** | **10** | **11** | **12** | **13** |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| **Language/Dialect (भाषा/बोली)** | **Place of (चे ठिकाण)** | | | | | **Others (इतर)** |
|---|---|---|---|---|---|---|
| | **Burn Mark (भाजल्‍ याच्‍ ा खुणा)** | **Leucoderma (कोड)** | **Mole (तिळ)** | **Scar (व्रण)** | **Tattoo (गोदण)** | |
| **14** | **15** | **16** | **17** | **18** | **19** | **20** |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**

**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्‍ यापेक्षा अधिक तपशील दिल्‍ यास फक्‍ त यातील रकान्‍ यांची नोंद घेतली जाईल)**